# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ३९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १७/०१/२०१७

**१) अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १६/०१/२०१७ चे १४.१५ वा. दर. यातील फिर्यादीच्या अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३५४(अ)(१)(२) भादवी. सहकलम ८ बा.लै.अ.प्रतीबंधक कायदा २०१२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. कुरील पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) संगनमत करुन लाकडी मोगरीने डोक्याला मारुन दुखापत केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १५/०१/२०१७ चे १७.०० वा. दर. यातील फिर्यादीने आरोपीस माझ्या पत्नीला शिवीगाळ का केले असे हटकले असता यातील तीनही आरोपीतांनी संगनमत करुन शिविगाळ केली व आरोपी क्र. २ ने लाकडी मोगरी ने फिर्यादीचे मानेच्या वर डोक्याला मारुन दुखापत केल्याने फिर्यादी सदाराम उरकुडा गाडे वय ६५ वर्ष, रा. जयतपुर यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम ३२४,५०४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. बागडे पोलीस स्टेशन दिघोरी हे करीत आहेत.

**३) विवाहीतेस शारीरीक व मानसीक छळ केल्याने गुन्हा नोंद . :—**

फेब्रुवारी २०१० पासुन ते आज पर्यत यातील आरोपी ने फिर्यादी पत्नीला तुला मुलगा नाही तसेच तुझ्या आई वडीलांनी लग्ना मध्ये दहेज (हुंडा) दिले नाही या कारणावरुन फिर्यादी सोबत तोंडा तोडी भांडण शिविगाळ करुन शारीरीक व मानसीक त्रास दिल्याने व महीला समुपदेशन केंद्र यांचे लेखी पत्र क्रमांक ७३/१६—१७ दि. १६/०१/२०१७ अन्वये व फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४९८(अ) भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. शहारे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**४) मोटार सायकल चालकांने सायकल चालकास धडक देवुन गंभिर जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक १५/०१/२०१७ चे १६.३० वा. दर. यातील फिर्यादी दुर्योधन कवळु भोयर वय ४० वर्ष, रा. लोहारा यांचे वडील कवळु संपत भोयर वय ६५ वर्ष रा. लोहारा हे खरबी वरुन एनएच ०६ रोड ने पेट्रोलपंप कडे आपल्या सायकल ने येत असतांना त्याच्या मागेहुन येणाऱ्या यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल हयगयीने, भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन जखमीचे सायकलला धडक मारुन जखमी करण्यास कारणीभुत होवुन अपघात करुन पळुन गेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २७९३३७ भादवी. सहकलम १८४/१७७,१३४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. जनबंधु पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

**५) अवैध दारू अडयांवर धाडी . :—**

दिनांक १६/०१/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. लाखांदुर येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०१ गुन्हा दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ९०० मिली लिटर हातभट्टी दारु दारु कि. २५०/—रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

(बी. आर. गाडे)
**प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)**
**भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२**

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.